Cosmos Multidisciplinary Research E-Journal
Online Available at www.cmrj.in
Recognized International Peer Reviewed Journal
Impact Factor 4.94
ISSN No. 2456-1665

# जानकीबाई आपटे यांचे स्वातंत्र्य चळवळीतील योगदान

**कु.मंजूषा एस. लालसरे**
मुख्याध्यापिका, आदर्श हिंदी प्राथ.
विद्यामंदिर, गडचांदूर
मो.क्र. ९४०३१८४३३५

भारतीय स्वातंत्र संग्रामाच्या इतिहासात १९२० हे वर्ष अत्यंत महत्वाचे मानले जाते. या वर्षी नागपूर येथे झालेल्या राष्ट्रीय सभेने महात्मा गांधींनी पुरस्कृत केलेल्या असहकाराचा प्रस्ताव पास केला. या चळवळीमुळेच उच्च शिक्षित व उच्च मध्यमवर्गीय लोकांपूरती मर्यादित असलेली स्वातंत्र चळवळ विस्तार करू लागली. तरूण विद्यार्थी, शेतकरी, कामगार असे भिन्न भिन्न वर्ग चळवळीत सक्रियरित्या भाग घेवू लागले. गांधी युगात प्रथमच स्त्रिया राजकारणात शिरल्या. स्त्रियांनी राष्ट्रीय चळवळीस जो सक्रिय व स्वार्थ्य त्यागपूर्वक पाठिंबा दिल्या त्यामुळे स्त्रियादेखील राष्ट्रीय चळवळीस पुरूषांच्या खांद्याला खांदा लावून लढू शकतात हे सिध्द झाले. त्या काळात बोटावर मोजता येणाऱ्या स्त्रिया आपल्या कर्तबगारीने सार्वजनिक व राजकीय जीवनात पुढे सरसावल्या. ज्यांनी आपल्या कर्तुत्वाने या प्रांताच्या समाज जीवनाची ही दोनही अंगे पुरूषांच्या बरोबरीने उजळून काढली अशा स्त्रियांत सौ. जानकीबाई आपटे यांना प्रथम मान द्यावाच लागतो.

उद्देश –

१. जानकीबाई आपटे यांचे स्वातंत्र चळवळीतील कार्य अभ्यासणे.
२. जानकीबाईपासून कशी प्ररेण घ्यावी हे अभ्यासणे.
३. जानकीबाईंचे महान कार्याचा परिणाम अभ्यासणे.

इ.स. १९३० साली ब्रिटीश सत्तेविरूध्द सविनय कायदेभंगाचा लढा सुरू झाला आणि मिठाच्या सत्याग्रहाच्या प्रचारार्थ कॉंग्रेसच्या जेष्ठ नेत्या कमलादेवी चटोपाद्याय अहमदनगरला आल्या आणि त्यांच्या भाषणाचा प्रभाव जानकीबाईंवर पडला आणि त्या भाषणापासून प्रभावित होवून जानकीबाईंनी स्वातंत्र चळवळीत हिरहिरीने भाग घेतला. त्यात त्यांनी महिलांमध्ये देशप्रेम व पारतंत्र्याविरूध्द आवाज उठविण्यासाठी कार्यक्रमाचे नियोजन केले. प्रभातफेऱ्या काढणे, निदर्शने करणे, सभांना हजर राहणे इत्यादी कार्य जानकीबाईं करू लागल्या. १९३५ साली फैजपूर येथे भरलेल्या महाराष्ट्रातील पहिल्या ग्रामीण कॉंग्रेस अधिवेशनात स्त्रियांच्या पथकांसह उपस्थित राहून स्वागत गीत त्यांच्या हिंदसेविका संघाच्या चमुने म्हटले, आणि जेष्ठ नेत्यांच्या

छावणीच्या बाहेर पहारा देण्याचे तसेच त्यांच्या जेवणाची व्यवस्था देखील जानकीबाईंच्या पथकाने बघितली. त्यामुळे या जेष्ठ नेत्यांना जवळून पहाण्याचा त्यांच्या कार्याचा प्रभाव जानकीबाईंवर पडून त्यांनी आपले ध्येय निश्चित केले. आणि स्वातंत्र्यप्राप्ती, मानवता सेवा, समाजसेवा यासाठी आपले संपूर्ण आयुष्य खर्ची घातले.

१९३८-१९३९ मध्ये शहर कॉंग्रेस कमेटीच्या अध्यक्ष म्हणून जानकीबाईंची निवड करण्यात आली. त्यावर्षी २६ मार्च १९३८ रोजी जानकीबाईंनी स्वतःच्या सहीने एक पत्रक प्रसिध्द केले. त्यात त्यांनी गुढीपाढव्याच्या दिवशी लोकांना आपल्या घरी गुढीबरोबर तिरंगी झेंडा उभारण्याचे जाहीर आव्हाहन केले. हा राष्ट्रीय नाविन्याचा अभिनव प्रयोग जानकीबाईंनी यशस्वी केला. तसेच थोरा मोठ्यांच्या पुण्यतिथ्या, जयंत्या साजऱ्या करून त्यातून देशभक्तीची भावना लोकांमध्ये जागविण्याचे कार्यदेखील केले. जानकीबाई अशिक्षित होत्या त्यांना केवळ स्वतःची सही करता येत होती. परंतू त्या आपल्या अनुभवाच्या आधारे अतिशय रोचक आणि स्फुर्तीदायक भाषणे करीत होत्या.

वैयक्तीक सत्याग्रह हा नविन प्रकार असल्यामुळे काही कॉंग्रेस नेत्यांचा विरोध होता. वैयक्तीक सत्याग्रह करण्याकरीता कॉंग्रेसवर निष्ठा असणाऱ्या कार्यकर्त्यांचीच गरज होती म्हणून पहिले सत्याग्रही म्हणून आचार्य विनोबा भावे यांची निवड करण्यात आली होती. तसेच अहमदनगर जिल्ह्याच्या पहिल्या स्त्री सत्याग्रही म्हणून जानकीबाईंची निवड करण्यात आली होती. सोमवार दिनांक ०६ जानेवारी १९४० रोजी वैयक्तीक सत्याग्रह गांधी मैदान येथे करणार असल्याचे लेखी पत्र जानकीबाईंनी ब्रिटीशांना दिले आणि ०६ जानेवारी १९४१ रोजी सकाळी १०.०० वा. गांधी मैदानात जानकीबाई हजर झाल्या. वैयक्तीक सत्याग्रहाची नोटीस आधीच दिली असल्यामुळे पोलीस जानकीबाईंच्या धनगर गल्लीतील घराभोवती आणि पटवर्धन वाड्याच्या भोवती पाळत ठेवून होते. जानकीबाई जशा गांधी मैदानात गेल्या त्यांच्या मागोमाग पोलीस देखील तिथे गेले. जानकीबाईंबरोबर हिंद सेविका संघाच्या बऱ्याच सभासद होत्या. जानकीबाईंनी जमलेल्या जनसमुदायासमोर भाषण द्यायला सुरूवात केली, युध्दाची माहिती दिली आणि ब्रिटीश सरकार भारतीय तरूणांचा युध्दामध्ये कशाप्रकारे वापर करीत आहे आणि सर्वसामान्य निष्पाप तरूणांचा जीव कसा देणार होते हे पटवून दिले. शेवटी ब्रिटीश सरकारचा निषेध करून जोर जोराने घोषणा देत सत्याग्रहाला प्रारंभ केला.

मिरवणूक गांधी मैदानातून निघाली तेव्हा सेवा दलातील बरीच मुले जानकीबाईंसोबत होती. सर्वांच्या पुढे राजा भोंजाळ नावाचा मुलगा हातात तिरंगा घेवून पुढे-पुढे चालत होता. जानकीबाईंसोबत बाळासाहेब भारदे आणि सत्याग्रह समितीचे इतर सभासद होते. मिरवणूक

घोषणा देत चालली होती, या युध्दाला कपडे देवू नका, माणसे देवू नका, पैसे देवू नका अश्या, घोषणा देत जानकीबाईं पुढे-पुढे चालत होत्या. मिरवणूक घोषणा देत बागडे थेटरच्या जवळील पोलीस ठाण्या जवळ आली. ठाण्यातून एक ब्रिटीश अधिकारी बाहेर आला अधिकाऱ्याला पाहून जानकीबाईंनी आणखी जोर जोऱ्याने घोषणा देण्यास सुरूवात केली. सर्वांना वाटले आता जानकीबाईंना अटक होईल परंतू जानकीबाईंच्या सोबतचा ७००-८०० लोकांचा जनसमुदाय पाहून ब्रिटीश अधिकारी घाबरले आणि कुठल्याही प्रकारचा अनुचित प्रकार घडू नये म्हणून ब्रिटीश अधिकाऱ्यांनी अतिशय सावधगीरी पाळली आणि दुसऱ्या दिवशी दिनांक ०७ जानेवारी १९४१ रोजी जानकीबाईंना अटक करण्यात आली.

मुंबई अधिवेशनाला जानकीबाईं आपल्या सहकाऱ्यांसह गेल्या होत्या ०९ ऑगष्ट १९४२ पासून अभुतपूर्व संघर्षाला तोंड फुटले कारण, सर्व जेष्ठ नेत्यांना ब्रिटीश सरकारने अटक केली होती. त्यामुळे सगळीकडे हाहाकार माजला होता. आणि लोकांनी हिंसात्मक आंदोलने करण्यास सुरूवात केली होती. जानकीबाईं देखील तातडीने ०९ ऑगष्टचा "चलेजाव" संदेश घेवून अहमदनगरला परतल्या. त्यांनी स्त्रियांचे आंदोलन संघटीत करून झाशीच्या राणीप्रमाणे स्वातंत्र लढा दिला. जोर जोराने चलेजावच्या घोषणा देत होत्या. गुप्तपने मिटींग घेत होत्या, बैठका घेत होत्या. कुठे कोणती निदर्शन करायची याचे त्या नियोजन करीत होत्या त्यामुळे जानकीबाई या कॉंग्रेसच्या सक्रिय महिला सभासद असल्यामुळे जानकीबाईंना १६ ऑगष्ट १९४२ रोजी अटक केली. भारतीय अंतर्गत सुरक्षा कायद्याखाली जानकीबाईंवर खटला न भरता स्थानबध्द करण्यात आले व त्यांची रवानगी अहमदनगरवरून पुण्याच्या येरवाड्याच्या तुरूंगात करण्यात आली आणि तिथून पुढे येरवाड्याच्या तुरूंगातून कर्नाटकातील हिंडलगा तुरूंगात जानकीबाईंची व इतर १४ जणींची रवाणगी करण्यात आली.

संदर्भ -

१. Home Department (SPL) १९४० फाईल नं. १०२०(९)-१
२. नगर टाईम्स २८ ऑगष्ट १९७० केसरी वृत्तपत्र २२ मार्च १९६४
३. भा.प.आपटे कर्मयोगी जानकीबाई आपटे श्री. विद्या प्रकाशन